आठवी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'देश-विदेशातील मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी'

संपादक

डॉ. स्नेहल तावरे



आठवी

आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश–विदेशातील मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी

संपादक

डॉ. स्नेहल तावरे

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

ஐ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १२३७

ஐ देश-विदेशातील मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी

ஐ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे - ४११ ०३०.
स्थिरभाष : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
भ्रमणभाष : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई-मेल : snehaltawre@gmail.com



ஐ © S.R.I.



ஐ **प्रथमावृत्ती :** २६ जानेवारी २०१९
(आठव्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेच्या निमित्ताने)

ஐ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ஐ **अक्षरजुळणी :** एस. एस. ग्राफिक्स, पुणे

ஐ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

ஐ ISBN 978-93-87628-40-3

ஐ **पृष्ठसंख्या :** ११६

ஐ मूल्य : ₹ १५०/-
$ 3

# मूल्यक्रम


- 'मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी'च्या निमित्ताने... — डॉ. स्नेहल तावरे /७

१. जीवनमूल्यविवेक मराठी भाषेचे उद्‌गाते - संत ज्ञानेश्वर — डॉ. अशोक शिंदे /११

२. मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी — डॉ. बाबुराव उपाध्ये /१५

३. उच्च शिक्षणात मूल्य शिक्षणाचे महत्त्व — डॉ. शोभा इंगवले /२१

४. तरुण पिढीची बदलती मूल्ये — डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर /२६

५. युवा पिढीसाठी ताओवाद — डॉ. भाऊसाहेब गमे /३१

६. मूल्याधारित शिक्षण आणि युवापिढी — डॉ. जगदीश शेवते /३५

७. मूल्य शिक्षणाची आवश्यकता आणि स्वामी विवेकानंद यांचे मूल्यविचार — डॉ. संगीता देशमुख /३९

८. आजची युवा पिढी आणि मूल्यशिक्षण — डॉ. लता महाजन /४४

९. मूल्यसंवर्धन करणारी तरुण पिढी — डॉ.ए.पी. मोरे /४९

१०. मूल्ययुक्त नवा भारत व नवे जगनिर्माणार्थ - भारतीय दार्शनिकांचे ऐतिहासिक मार्गदर्शन — डॉ. राजेश कुलकर्णी /५४

११. मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका — डॉ. उज्ज्वला लोणकर /५९

१२. मूल्यशिक्षणात युवकांचा सहभाग — डॉ. सोमनाथ दडस /६४

१३. आदर्श मूल्यशिक्षण आणि युवापिढी — डॉ. बाबासाहेब शेंडगे /६९

१४. मूल्यशिक्षणातून तरुण पिढी — डॉ. वर्षा पाठक /७३

१५. स्त्रीलिखित आत्मचरित्रातील मूल्यांचे स्वरूप — डॉ. वैजयंतीमाला जाधव /७९

१६. वि. रा. करंदीकर यांचे मूल्यचिंतन — प्रा. उज्ज्वला दीक्षित /८६

१७. भारतातील मूल्यशिक्षण आणि तरुण पिढी — प्रा. कामिनी थोरात /९१

१८. मूल्यशिक्षण व तरुण पिढी — प्रा. अरुणा राऊत /९६
१९. राष्ट्रीय एकात्मता आणि युवा पिढी — प्रा. नीलम देशमुख /९९
२०. युवा पिढीला आवश्यक असणारी मूल्ये — प्रा. जयश्री थोरवे /१०४
२१. आनंद संप्रदायातील मूल्ये आणि आजचा युवक — गायत्री पंडित /१०७
२२. श्री. अ. सि. पोटभरे यांच्या साहित्यातील मूल्यदर्शन — अंजली कुसुरकर /११२

# स्त्रीलिखित आत्मचरित्रातील मूल्यांचे स्वरूप
# ( १९१० ते १९५० )

डॉ. वैजयंतीमाला जाधव

स्त्रीवाङ्मयाचा उगम कित्येक वर्षांपूर्वीच झाला असला तरी त्याला लिखित स्वरूप यायला फारच काल लोटला गेला. ओवी, म्हणी, उखाणे, गीते यातून स्त्री स्वतःला भावलेली किंवा स्फुरलेली कलाकृतीच इतरांसमोर मांडत असे. त्यालाही अनेक बंधने होती. सण - उत्सव किंवा व्रतवैकल्याच्या वेळीच ती या गोष्टी सादर करताना दिसे. कामाला जुंपलेल्या बैलाप्रमाणे ती केवळ पडेल ते काम करीत असे. प्रसंगी ती स्वतःच्या आजारपणाकडेही दुर्लक्ष करताना दिसे.... यातूनच तिचे भावविश्व केवळ स्वतःपुरतेच मर्यादित होत गेले. लग्नापूर्वी ती वडिलांच्या धाकात, मोठे झाल्यावर भावाच्या धाकात, लग्नानंतर नवऱ्याच्या धाकात, म्हातारपणी मुलाच्या धाकात आणि या प्रत्येक अवस्थेत वडिलधाऱ्या साऱ्या लोकांच्या चांगल्या - वाईट नजरांना मानराखत, स्वतःचा मान आहे हे विसरून स्त्री केवळ सर्वांच्या सेवेत तत्पर राहिली. इतकी की स्त्रीला पुरुषांपेक्षा वेगळे स्वतंत्र स्थान आहे हे तिच्या गावीही राहिले नाही. किडा - मुंगी - कीटक तरी आपापल्या अस्तित्वखुणा जपतात तर स्त्रीला फक्त पुरुषसेवेकरिता जन्म झाल्याचे धडे तिच्यावर नकळतच जन्मापासून झालेले असतात. आपले मन दुसऱ्यांजवळ व्यक्त करण्याची मुभा त्यांना मिळत नव्हती. त्यातूनच त्या एकट्या पडत गेल्या आणि केवळ स्वतःपुरत्या स्त्रिया दुःख हलकं करण्याचा प्रयत्न गुणगुणत काम करत गेल्या. कालांतराने इंग्रजी राजवटीचे वारे भारतात घुमू लागले आणि भारतीय समाजसुधारकांच्या मदतीने स्त्री ने शैक्षणिक पाऊल उचलले. त्यातूनच त्या स्वतःविषयी लिहू लागल्या, बोलू लागल्या, नोकरी, कुटुंब सांभाळू लागल्या. आणि स्वतःविषयीची सतत बोचणारी सल त्यांनी आत्मचरित्राच्या रूपाने व्यक्त केली.या आत्मचरित्रामधून त्या काळातील अस्तित्वात असलेल्या मूल्यव्यवस्थेचे दर्शन घडते.

श्रीमती रमाबाई रानडे यांनी १९१० मध्ये न्यायमूर्ती गोविंद रानडे यांच्याबरोबर आयुष्य व्यतीत करताना आलेले अनुभव, घटना यांचे केलेले

आत्मकथन आमच्या आयुष्यातील काही आठवणींच्या स्वरूपात मांडल्या आहेत. मराठी साहित्यातील आधुनिक काळातले पहिले स्त्रीलिखित आत्मचरित्र म्हणून 'आठवणी' ना मान आहे. १९०१ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे निधन झाले. त्यानंतर नऊ वर्षांनी म्हणजे १९१० मध्ये श्रीमती रमाबाई रानडे यांनी का. र. मित्र यांच्या मदतीने मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळींतर्फे त्यांच्या आठवणी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्या.

रमाबाई रानडे यांनी आत्मचरित्राचा पूर्ण गाभा हा पतीच्या संपूर्ण आयुष्याचा घेतलेला वेध आहे. माधवरावांची घरगुती प्रतिमा, समाजातील स्थान, ध्येयनिष्ठता, चातुर्य आणि एकूणच संपूर्ण जीवनातील आढावा त्यांनी 'आठवणी' तून मांडला आहे.

रमाबाई रानडे यांनी 'आठवणी' मधून तत्कालीन घडामोडी, स्त्रीजीवन, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. स्त्री शिक्षणाला सुरवात झाल्यानंतर समाजात उमटणारे पडसाद रमाबाईंनी टिपले आहे.

या आत्मचरित्राची अर्पणपत्रिकेपासून ते आपलेसे वाटू लागते. मानलेल्या मुलीचा आणि पती महादेवरावांचा सर्व जीवनपट त्यांनी शब्दबद्ध केला. महादेवरावांच्या आठवणीत खिन्न – उदास झालेल्या रमाबाईंना मानलेल्या मुलीने आठवणी लिहिण्यास सुचविले त्यातूनच या आत्मचरित्राचा जन्म झाला.त्या काळातील स्त्रियांवर असणारी बंधने याचे दर्शन या आत्मचरित्रामध्ये घडून येते.

गोपाळ कृष्ण गोखले हे महादेवरावांचे शिष्य होते. राजकीय वारसदार, कुटुंबस्नेही तर होतेच; त्यामुळेच या 'आठवणी' ना गोखले यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

स्त्रियांसाठी पती हाच परमेश्वर असे मानण्याच्या काळात थोर समाजसुधारकांच्या घरातील चित्र कोणत्या स्वरूपाचे होते हे आठवणींतून समोर येते. माधवरावांच्या सेवाभावी वृत्तीत, समंजसपणात, ध्येयवादी आकांक्षात, नेतृत्व गुणात, प्रेमात, रागात आणि एकूणच जीवनप्रवासात रमाबाईंना नेहमीच त्यांचा सार्थ अभिमानच वाटला आहे. रमाबाईंनी त्यांना ज्या घटना सांगाव्या वाटल्या त्या शब्दबद्ध केल्या. काही प्रमाणात त्या तटस्थपणा दाखवतात. संपूर्ण जीवनकथा नसूनही अतिसंवेदनशील बनण्याचा विक्रम आठवणींनी केला आहे.

'स्त्री' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध होत यशोदाबाई आगरकर यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या आहेत. १९३८ साली मासिकातून प्रसिद्धी मिळवल्यानंतर १९९६ मध्ये पुस्तकरूपाने वाचकांसमोर आत्मचरित्र आले.



आगरकरांच्या मृत्यूनंतर ४३ वर्षांनंतर यशोदाबाईंनी वयाच्या बहात्तराव्या वर्षी या आठवणी सांगितल्या आणि अकोला काँग्रेस कमिटीचे कार्येकर्ते श्री. मुनी यांनी त्या शब्दबद्ध केल्या. आठवणी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ एका वर्षातच यशोदाबाईंचे निधन झाले. वयानुसार आणि इतक्या वर्षांच्या कालावधीनंतर घडलेल्या घटनांचे पडसाद कमी होतात अथवा त्याबद्दलच्या विचारांत मतपरिवर्तन होते. त्यानुसार काही घटनांचे अपवाद वगळता त्यांच्या लेखनात स्वच्छता आणि तटस्थ वृत्ती आहे. आगरकर थोर समाजसुधारक असल्याने समाज सुधारण्याचे कार्य आपल्या घरापासून आपल्या पत्नीला सुशिक्षित करून करण्याचा त्यांचा मानस होता. मात्र यशोदाबाईंनी शिकण्यास नकार दिला. ते नेहमी विनवणी करत गेले आणि त्यांची विनवणी यशोदाबाईंनी सक्ती न समजता सहजच फेटाळून आपलाच हट्ट पुरविला. हे जरी खरे असले तरी आगरकरांच्या नंतर त्यांनीही समाजकार्यात स्वतःला झोकून दिले.

तत्कालीन परिस्थितीला साजेसे वातावरण त्यांनीही उपभोगले.... लहान वयातील लग्न, हातून होणाऱ्या चुका, त्यामुळे मिळणारा ओरडा, कामांची अखंड साखळी. मात्र या सगळ्यात त्यांना नवऱ्याचा शांत, समजूतदारपणा त्यांना अधिक भावला.

यशोदाबाईंच्या मनावर अगदी जुन्या वळणांचे खोल संस्कार झाले होते. त्यामुळे सतत व्रत – वैकल्ये, सण – समारंभ त्या यथासांग पद्धतीने करत. आगरकरांनी त्यांना अडविले नाही मात्र हे केल्यामुळे खरेच जीवनात काय बदल होतात का हे मात्र ते विचारत असत. अर्थातच उत्तर न मिळाल्याने ते कर्मकांडपणाचा कळस यशोदाबाईंना समजावून सांगत असत.

यशोदाबाईंच्या मनाचा विकास होण्यास उशीरा सुरूवात झाली आणि पूर्ण होण्याआधीच आगरकरांचा मृत्यू झाला. यशोदाबाईंनी सामाजिक परिस्थितीचा सर्वांगीण बाजूने विचार केला असला तरी त्यांचे आत्मचरित्र वाचकांच्या मनावर राज्य करत नसल्याचे दिसून येते.

१९२१ ते १९४७ असा लेखनकाळ असणारे एकमेव दीर्घकालीन लेखनमाला आत्मचरित्र हे काशीबाई कानिटकरांचे आहे. आणि त्यानंतर तब्बल ३३ वर्षानंतर म्हणजेच १९८० साली त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. मराठी साहित्यातील प्रमुख लेखिकांपैकी त्याही एक होत. मात्र त्यांच्या आत्मचरित्राविषयी अधिक माहिती दुर्दैवाने समोर आली नव्हती. काशीबाईंनी अनेक मासिकांमधून सामाजिक विषयांवर भाष्य केले. कादंबऱ्या, कथासंग्रह त्यांच्या नावे मोठ्या प्रमाणात आहेत आणि त्यांनीच डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्रलेखन तर थोर साहित्यकार हरिभाऊ आपटे यांची पत्रे

संपादित केली आहेत.

समकालीन परिस्थितीचे चढ – उतार त्यांच्याही वाट्याला आले. नकळत ते आत्मचरित्रात ठसठशीतपणे उतरले. अनेक प्रसंग, व्यक्ती, स्वच्छ स्मृती आणि वैभवसंपन्न लेखनशैलीमुळे त्यांचे आत्मचरित्र प्रभावी ठरले आहे. गोविंदराव कानिटकरांच्या पत्नी या नात्याने त्यांनी लेखन कमी केले. मात्र सामाजिक अंगाने प्रगल्भ लेखन आणि विशिष्ट वर्तुळाचा परिघ ओलांडून तत्कालीन जीवनातील संपूर्ण जीवनपट त्यांनी रेखाटला आहे. त्यात स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर असा कालखंड रेखाटताना त्यांची तटस्थ वृत्तीही लक्षात येते.

१९२८ साली प्रसिद्ध झालेले आत्मचरित्र म्हणजेच 'माझी कहाणी'. आत्मचरित्रकार लेखिका या पार्वतीबाई आठवले होत. त्यांनी त्यांच्या एकूण जीवनाचा संपूर्ण आरसा या आत्मचरित्रात मांडला आहे. त्या बालविधवा होत्या. पदरात एक लहान मूल आणि जीवनाचा संघर्ष या सर्वांचे त्यांच्यावर झालेले परिणाम आणि त्यातून त्यांना कर्वे स्त्री – शिक्षण संस्थेशी जोडण्याची एक नवी दिशा मिळण्याची संपूर्ण परिस्थिती माझी कहाणीमध्ये त्यांनी रेखाटली आहे.

कोकणातल्या बाळकृष्ण जोशींच्या अकरा मुलांपैकी पार्वतीबाई एक. त्यांचीच बहीण गोदू या थोर समाजसेवक धोंडो केशव कर्वे यांच्या पुनर्विवाहित पत्नी होत्या. आणि पार्वतीबाईंच्या आयुष्याला एक नवे वळण मिळण्याचे कारण म्हणजे त्या कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेला जोडल्या गेल्या. त्यातूनच त्यांच्या जीवनाला खरा अर्थ प्राप्त झाला.

तत्कालीन परिस्थितीचा आढावा त्यांनी सोप्या भाषेत मांडला आहे. आमच्या गावी त्या वेळी म्हणण्यासारखी मुलांचीच शाळा नव्हती, मग मुलींची कोठून असणार? त्यावेळी मोठ्या घरच्या मंडळींत बायकांनी शिकावे की नाही, या विषयाची चर्चादेखील कधी होत नसे. स्त्रीशिक्षणाचा प्रश्नच तेव्हा फारसा उत्पन्न झाला नव्हता. आम्हा लहान मुलींना पूजेची तयारी करता आली, तांदूळ कांडता येऊ लागले, उष्टे – खरकटे काढता येऊ लागले, लहान मुलांना अंघोळ घालून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करता येऊ लागली म्हणजे आम्हाला मिळायचे ते सर्व शिक्षण मिळाले असे त्या वेळी समज असे. आमची त्यावेळची मॅट्रिक परीक्षा म्हणजे भात – पिठले करता येऊन दोन पानांचा स्वयंपाक करता येणे ही असे. मी माझ्या अकराव्या वर्षी ही परीक्षा पास झाले होते. या त्यांच्या सरळ आणि वास्तवदर्शीपणामुळे एकूणच स्त्रियांची तेव्हाची एकूण परिस्थिती काय होती हे लक्षात येते.

पंचविशीत आल्यावर शिक्षणाचे पाऊल, हिंगण्याचे वातावरण, मेव्हणे



(कर्वे) यांनी केलेली एकूणच मदत या सगळ्या गोष्टींतून पार्वतीबाई जीवनाकडे समजूनच सकारात्मक दृष्टीने पाहू लागल्या. इंग्रजी शिकल्या, पैसा कमावला, समाजाला मदत केली, विधवांसाठी अनेक प्रकारे कार्य हाती घेतले. असे अतिशय जिद्दी आणि चिकाटीने समरस असलेले हे आत्मचरित्र प्रभावी भाषाशैलीने संपन्न आहे. म्हणूनच वाचकप्रियताही या आत्मचरित्राला लाभली आहे.

केशव भिकाजी ढवळे यांनी १९४४ साली बाया कर्वे (आनंदीबाई ऊर्फ बाया) यांचे आत्मचरित्र 'माझे पुराण' या नावाने प्रकाशित केले. दुर्दैवाने बाया कर्वे तेव्हा हयात नव्हत्या.

आठव्या वर्षी आलेले विधवापण, अतिगरिबीचे संकट, अकरा भावंडांसोबत आईने एकटीने ओढत आणलेला संसार. नवरा हयात नसताना सासरी जाऊन त्रास सहन करताना बालमनाची होणारी ससेहोलपट मात्र या सगळ्यात त्यांच्या सासुबाईंनी केलेली मदत, दिलेला धीर आणि समजूतदारपणामुळे त्यांच्या वागण्यात धीटपणा येत गेला. विधवा म्हणजे बेवारस वस्तू असल्याच्या काळात त्यांना सासूचा पाठिंबा मिळणे त्यांच्यासाठी सकारात्मक गोष्ट ठरली. २१ वर्षांच्या गोदूच्या जीवनाला नवे वळण येत गेले. कामानिमित्त मुंबईला जाणे आले आणि त्यातूनच भावाच्या पाठिंब्यामुळे त्यांनी १९८९ मध्ये सुरू झालेल्या 'शारदासदन' मध्ये पहिली विद्यार्थिनी म्हणून प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला.

१९९३ साली धोंडो केशव कर्वे यांच्याशी केलेला पुनर्विवाह, कोकणात गेल्यावर झालेला त्रास, झेपणार नाही एवढे केलेले कष्ट, गरीब माहेरघरचा विचार, कर्वे यांचा अल्पित विचार, बायकोबद्दलची कर्व्यांची मनोवृत्ती, अनपेक्षित बाळंतपण, तुझे तू कर किंवा पहा असे सांगणाऱ्या कर्व्यांच्या मनात बायासाठी प्रेम दिसले नसले तरी बाया सांगतात त्यांची वृत्ती परखड होती. स्वतःच्या बाळंतपणात झालेल्या त्रासामुळे सुईणकाम शिकून त्या अनेकींना मदत करत राहिल्या. इतरांच्या सहज लक्षात येणाऱ्या गोष्टी कर्व्यांच्या गावीही नसल्याचे त्यांनी प्रांजळपणे सांगितले आहे. कर्व्यांचा राग, विमा बायाला कळू न देता संस्थेच्या नावी केला, कोणत्याही गोष्टीत बायाला सहभागी होऊ न देता परस्पर निर्णय घेऊन कर्व्यांनी नेहमीच बायाला गौण मानले. मात्र त्यांनी समाजसुधारकांचे काम कसे चोख पार पडले हे बाया आवर्जून सांगतात. एकूणच या आत्मचरित्रात बायाने संपूर्ण जीवनातील चढ – उतार मांडले आहेत. कर्वे हेकट असले तरी त्यातून ते कसे खरे होते हे सांगताना सोज्ज्वळ पत्नीचे रूप बायाचे नकळत स्पष्ट होते.

साहित्यसम्राट न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या कन्या कमलाबाई देशपांडे यांचे १९४३ साली 'स्मरण - साखळी' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. कर्वे शिक्षण संस्थेशी निगडित असलेले हे तिसरे आत्मकथन आहे. कमलाबाई देशपांडे या शिक्षिका, वाचक, वक्त्या आणि उत्तम कवयित्री होत्या. विविधांगी कलांमध्ये निपुण होत्या. नेहमीच त्या स्वतंत्र्य मते मांडत असत. त्याकाळची परिस्थिती पाहता त्यांना प्रत्येक गोष्टीत अधिक मुभा मिळाली होती. डेक्कन कॉलेजमध्ये शिकणारे आणि देखणे असणारे यजमान बाबुरावही रसिक आणि हुशार होते. २ ते ३ वर्षांच्या संसारमालेत बाबुरावांच्या निधनामुळे अनेक वादळे आली. सुदैवाने कमलाबाईंना समाजाने सकेशा म्हणून स्वीकारले होते. मुलगा तीन महिन्यांचा असतानाच झालेला आघात त्यांनी अतिकष्टाने सोसला. हिंगण्याच्या आश्रमात पदवीधर झाल्या. परदेश प्रवास केला. स्वतंत्र्य व्यक्तिमत्त्व असल्यामुळे त्यांनी परतल्यावर साताऱ्याला कन्या शाळा चालवली. वास्तविक पाहता जिद्दी आणि बुद्धिचातुर्याने युक्त हे आत्मचरित्र आहे. तात्यासाहेब केळकरांचे स्वभावगुण, तत्कालीन समाजसुधारकांचे रेखाचित्र, शैक्षणिक विचारमंथन, साताऱ्याची कन्या शाळा, हिंगण्याचे आश्रम यां विषयी अनेक सखोल माहिती यात असली तरी त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात मानसिकतेच्या विळख्यात बसलेल्या चटक्यांना दुर्लक्षित ठेवले आहे. एकूणच सामाजिक आणि मानसिक दडपणाला त्यांनी स्मरण - साखळीतून व्यक्त केले.

रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांना स्वतंत्र ओळख मिळाली ती त्यांच्या 'स्मृतिचित्रे' या आत्मलेखनामुळे. स्मृतिचित्रे वाचल्यावर मनाच्या अथांग विचारांमध्ये अधिकाधिक तरंग निर्माण होण्यातच लक्ष्मीबाईंच्या आत्मचरित्राचे यश आहे. १९३० साली त्यांनी लेखनास सुरूवात केली. पहिला भाग १९३४ साली तर चौथा भाग १९३६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर अनेक आवृत्त्या प्रसिद्धीस आल्या. सर्वसामान्य आयुष्याच्या वाटेवर हिंदुत्व सोडून ख्रिस्ती धर्मात होणारे पदार्पण एक नवे वळण आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्नांचे खोल - खोल भोवरे या आत्मचरित्रात वाचायला मिळतात.

एकूणच समकालीन परिस्थितीची सावली या आत्मचरित्रातही डोकावलेली दिसते. लहान वयातील लग्न, संसार, न झेपणारी कामे, प्रापंचिक ओढाताण आणि विक्षिप्त नवऱ्याच्या प्रेमळ आणि दुःखद गोष्टींचा हा आलेख 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्रात उमटला आहे.

१९३९ मध्ये पंडिता रमाबाईंच्या शिष्या कृष्णाबाई गद्रे यांचे 'स्मृतिसुमने' या नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. १९४७ मध्ये अन्नपूर्णाबाई रानडे यांचे



आत्मचरित्र 'स्मृतिरंग' या नावाने प्रसिद्धीस आले. १९४८ मध्ये लगेचच इंदिराबाई भागवत यांनी त्यांचे आत्मकथन 'या सदाशिव' या नावाने प्रसिद्ध केले. एकूणच या वरील आत्मकथनामध्ये पतिचरित्र डोकावते तर कधी समकालीन वैवाहिक स्थिती, सामाजिक, राजकीय आणि जातीय विकोपाला जाणारे भेदही स्पष्ट होतात तर समाजसुधारकांचे मोठे कार्य नव्याने नजरेस पडते.

'आमची अकरा वर्षे' हे एक लक्षणीय आत्मकथन प्रसिद्ध झाले. १९४५ साली कवी माधव त्र्यंबक पटवर्धन (माधव जूलियन) यांच्या पत्नी लीलाबाई पटवर्धन यांनी ते रेखाटले आहे. या आत्मचरित्रातही वरील आत्मचरित्रांसारखाच एकसुरीपणा असला तरी निवेदनशैली आणि माधवरावांच्या गत आयुष्यातील घडलेल्या घटनांचे वर्तमान आणि भविष्यात होणारे सारे परिणाम लीलाबाईंनी अतिशय समजसपणे मांडले आहेत. दुःखात दिलेली साथ आणि मनोधैर्य यांमुळेच त्यांच्या आयुष्यातील ही संसाराची अकरा वर्षे कशी वादळातही तग धरून होती हे वाचताना वाचकांच्या मनातही अनेक तरंग निर्माण होतात. इतर मुलींपेक्षा लीलाबाई बी. ए. झाल्यावर १९२८ मध्ये माधवरावांच्या अर्धांगिनी झाल्या. ते ३४ वर्षांचे होते. दोघेही समंजस आणि मनाने स्थिर, त्यामुळे गतकालीन आयुष्याला अधिक कवटाळून न बसलेले बरे या मताने ते संसार-रथ ओढत गेले. माधवरावांचे पहिले प्रेमसंबंध, त्यातली निराशा, खचलेले माधवरावांचे मन, अतिसंवेदनशीलता, अस्थिरता, समाजातील टोचण, फर्ग्युसन कॉलेजमधील बदनामी या संपूर्ण परिस्थितीचा आलेख त्यांनी लीलाबाईंना सांगितला असल्याने अकरा वर्षांच्या संसारात चढ - उतार मंद स्वरूपात होते.

एकूणच या आत्मकथनात उत्कट प्रेम असणारे हे पति - पत्नी आपला विवाह कशा रीतीने यशस्वितेकडे घेऊन जातात याचे अतिशय बोलके उदाहरण आहे.

प्रारंभीचे १९१० ते १९५० या कालखंडातील आत्मचरित्रांमधे त्या काळातील अस्तिवात असलेली समाजरचना, त्या कालखंडातील मूल्यव्यवस्थेचे दर्शन घडते. प्रारंभी पतिचरित्र, विधवा जीवन, शिक्षणाची ओढ, हातून घडलेले समाजकार्य असा हळूहळू होणारा प्रवास आत्मचरित्रातून समोर येतो. पारंपरिक मूल्यव्यवस्थेला स्वीकारून या कालखंडातील स्त्रियांनी आपला विकास केला आहे असे दिसते.